स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**Office of the Controller of Examinations**

**Phone: (02462) 229294** **Website: www.srtmun.ac.in** **E-mail: srtmuncoe@gmail.com**
**Fax : (02462) 229520**

जा.क्र.पनिका/परिक्षा शुल्कमाफी/२०१५-१६/४१२३ दिनांक : २८/०१/२०१६.

**तातडीचे परिपत्रक/कालमर्यादित**

प्रति,
**मा. प्राचार्य / संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये (व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रम) / सर्व संकुले,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीबाबत.**

संदर्भ : १. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एफईडी १५९२/१२०२/(११३२) साशि-५, दि. १८ ऑक्टोंबर १९९३.
२. क्रमांक उशिसं/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५-१६/१२४८५, दि. ०३/१२/२०१५.
३. जा.क्र.विशिससं/उशि/नांवि/शिष्यवृत्ती/२०१५-१६/८३७७, दि. ०९/१२/२०१५.
४. जा.क्र.विशिससं/उशि/नांवि/शिष्यवृत्ती/२०१४-१५/४२७-२८ दि.२५/०१/२०१६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भीय शासन निर्णय / पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ज्या गावांची हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे अशा टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीची योजना लागू केली आहे. यात अकृषि विद्यापीठाकडुन घेण्यात येणा-या परीक्षांचा समावेश आहे. उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील शासन निर्णयान्वये राज्यातील २०१५-१६ च्या खरीप हंगामात चारही जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या १४७०८ गावांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थीती जाहीर केलेली आहे तसेच सदर शासन निर्णयान्वये दुष्काळग्रस्त परिस्थीतीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचे जाहीर केलेले आहे. यास्तव सदर १४७०८ गावांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात कळविण्यात आलेले आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

वरीलप्रमाणे दुष्काळग्रस्त परिस्थीती जाहीर करण्यात आलेल्या गावातील जे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात शिक्षण घेतात व ते उन्हाळी-२०१६ परीक्षेसाठी बसणार आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या (नापास होवून परीक्षा फॉर्म भरलेले विद्यार्थी व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थी सोडून) नियमित प्रवेश घेतलेल्या ई.बी.सी धारक विद्यार्थ्यांची फीस शुल्काची प्रतिपुर्ती करण्यासाठी लागणारी रक्कम प्रपत्र-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती प्रमाणपत्रासह परीक्षा विभागात सादर करावी.

**प्रपत्र - अ**

| अ.क्र | विद्यार्थाचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | वर्ग | गावाचे नाव | तालुका/जिल्हा | परीक्षा शुल्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, वर यादीत दर्शविलेले परीक्षार्थी या महाविद्यालयातील नियमित विद्यार्थी असून ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल (उन्हाळी)-२०१६ परीक्षेस बसलेले आहेत. ते टंचाईग्रस्त गावातील रहिवाशी आहेत. म्हणून ते परीक्षा शुल्काची प्रतीपुर्ती करण्यात पात्र आहेत. त्यांना शासनाकडून इतर कोणत्याही मार्गानी परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती मिळालेली नाही.

**प्राचार्यांची/संचालकांची स्वाक्षरी व शिक्का**

**महाविद्यालयाचे नाव**

वरीलप्रमाणे टंचाईग्रस्त गावांतील परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीस पात्र असलेल्या उन्हाळी-२०१६ च्या परीक्षेसाठी पदवी व पदव्युत्तर(व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या) विद्यार्थ्यांकडुन महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा शुल्क न घेता त्यांचे आवेदनपत्रे स्विकारावीत व परीक्षा विभागाने दिलेल्या तारखेस परीक्षा विभागास दाखल करावेत. त्यापुर्वी खालील तक्त्यामध्ये (प्रपत्र-अ व ब) विद्यार्थ्यांची माहिती srtmuncoe@gmail.com या इ-मेलवर दि.०५/०२/२०१६ रोजीपर्यंत न चुकता पाठवावी.

ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकारतर्फे व इतर शिष्यवृत्ती जसे, समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास विभागाकडुन शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संबंधित कार्यालयाकडुन महाविद्यालयास प्राप्त आहेत त्यांचे परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांच्या परीक्षा आवेदनपत्रासह परीक्षा विभागाने जाहीर केलेल्या कालावधीत परीक्षा विभागास विद्यार्थ्यांच्या यादीसह सादर करण्यात यावेत.

आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी टंचाईग्रस्त गावातील रहिवाशी असून ज्यांनी हिवाळी-२०१५ परीक्षेकरिता परीक्षा शुल्क सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क रकमेच्या प्रतीपुर्तीसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव प्रपत्र -ब मध्ये प्रमाणपत्रासह सादर करावे.

**प्रपत्र - ब**

| अ.क्र | विद्यार्थाचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | वर्ग | गावाचे नाव | तालुका/जिल्हा | भरलेले परीक्षा शुल्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, वर यादीत दर्शविलेले परीक्षार्थी या महाविद्यालयात नियमित विद्यार्थी असून ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी-२०१५ परीक्षेस बसलेले होते. ते टंचाईग्रस्त गावातील रहिवाशी आहेत. त्यांनी परीक्षा शुल्क भरलेले आहे. म्हणून ते परीक्षा शुल्काची प्रतीपुर्ती करण्यात पात्र आहेत. त्यांना शासनाकडून इतर कोणत्याही मार्गानी परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती मिळालेली नाही.

**प्राचार्यांची / संचालकांची स्वाक्षरी व शिक्का**

**महाविद्यालयाचे नाव**

सबब, उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थांचे उन्हाळी-२०१६ च्या परीक्षेकरिता परीक्षा शुल्क स्वीकारू नये व हिवाळी-२०१५ च्या परीक्षेसाठी परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपुर्तीसाठी प्रस्ताव सादर करावेत.

कृपया, उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव srtmuncoe@gmail.com या इमेलवर दि. ०५/०२/२०१६ पर्यंत पाठविण्यात यावेत. जेणेकरून त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव सादर करता येईल.

कळावे,

आपला,

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीस्तव सादर :**

मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र- कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. संचालक, उच्चशिक्षण संचालनालय, म.रा, पुणे
मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, नांदेड.
मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव व कार्यालयीन अधिक्षक (सर्व) परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव